MHAH160001692022

**<u>निशाणी ३८ खालील आदेश</u>**

( शितल गुरव वि. संदेश गुरव )

प्रस्तुत मुळ अर्ज अर्जदाराने सामनेवालांविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे सरक्षण कायदा २००५ नुसार न्यायप्रविष्ठ केलेला आहे.

२. सदरचा अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचार कायद्याविषयी दाखल केलेला आहे. त्यात सदर चौकशी अर्जास सामनेवाला याचे विरुध्द निशाणी ५ वर मे. कोर्टाने अर्जदार हीस दरमहा ३०००/– रुपये द्यावे असा हुकूम केला आहे. परंतु, सामनेवाला त्याप्रमाणे पैसे भरत नाही. कोर्टाचे हुकुमाचा अवमान केला आहे तरी सामनेवाला याचा डिफेंस स्ट्रक आऊट करण्यात यावा अशी विनंती केली.

३. सदर अर्जास सामनेवाला यांनी हरकत घेवून आपले म्हणणे सदर अर्जाच्या खाली दाखल केले. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराचा अर्ज व त्यातील मजकूर बरोबर नाही. सबब, रद्द करण्यात यावा. वास्तविक सा.वाला याने निशाणी २५ वर २०००/– रुपये, निशाणी २६ वर १०,०००/– रुपये, निशाणी २९ वर १०,०००/– रुपये, निशाणी ३३ वर २,०००/– रुपये, निशाणी ३५ वर २,०००/– रुपये भरलेले आहेत. त्यामुळे सा.वाला हा दाव्यातली पोटगी भरत नाही हे म्हणणे चुकीचे आहे. अर्जदार हिने वसुलीसाठी वसुली प्रकरण दाखल करणे गरजेचे आहे. सा.वाला हा त्याचे ऐपतीप्रमाणे वेळोवेळी अन्नवस्त्राची रक्कम भरीत आहे. अर्जदार ही केवळ अर्जाचे कामकाज लांबविण्यासाठी सदरचे अर्ज देत आहे. सबब, अर्ज रद्द व्हावा. सा.वाला हा सदरच्या अर्जाचे कामकाज चालविण्यास तयार आहे. याही कारणास्तव अर्जदाराचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

४. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. मुळ अर्ज पाहिला. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत दाखल केलेला आहे. सदर प्रकरण हे अर्जदाराच्या उलटतपासाकरिता नेमण्यात आले आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता सामनेवाला याने सदर अर्जाच्या म्हणण्यामध्ये सदरचा अर्ज बरोबर नाही. सामनेवाला याने निशाणी २५ वर २०००/– रुपये, निशाणी २६ वर १०,०००/– रुपये, निशाणी २९ वर १०,०००/– रुपये, निशाणी ३३ वर २०००/– रुपये, निशाणी ३५ वर २०००/– रुपये भरलेले आहेत. अर्जदार हीने वसुलीसाठी प्रकरण दाखल करणे गरजेचे आहे. सामनेवाला हा त्याचे ऐपतीप्रमाणे वेळोवेळी अन्नवस्त्राची रक्कम भरत आहे. अर्जदार ही केवळ अर्जाचे कामकाज लांबविण्यासाठी सदरचे अर्ज देत आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

५. सदरचे प्रकरण हे कौटुंबिक हिंसाचापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम अंतर्गत दाखल असून त्याची गुणदोषावर निर्गती होणे आवश्यक आहे. त्याकरिता सामनेवाला याचा बचाव अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सामनेवाला हा अंतरिम पोटगीची रक्कम भरत असल्याचे दिसून येते. त्याने पुर्णतः टाळाटाळ केली आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे सामनेवाला यास त्याचा बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.
२. खर्चाबाबत काही आदेश नाहीत.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.03.10 17:51:00 +0530

दिनांक ०७.०३.२०२५

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अकोले.